MHBI160003312023

**नियमित दिवाणी दावा क्र. १९१/२०२३**
**जालींदर वि. अनिल व इतर**

## निशाणी १२ वरील आदेश.

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ नुसार न्यायालयीन आयुक्त नेमणूकीकरीता विनंती केली आहे.

२. प्रतिवादी हे गैरहजर राहिल्याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींचे म्हणण्याविना चालविण्यात आला.

३. वादीचा अर्ज व दाव्याच्या अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे विधीज्ञाचा युक्तीवाद ऐकला.

४. वादीच्या अर्जातील विनंतीस अनुसरुन दाव्यातील व अर्जातील कथने पाहीली असता असे दिसुन येते की, वादीने त्याचे दाव्यात दावा मिळकत गट नं.५४ व ६८ या मिळकतीमधील वादीचे मालकीचे मिळकती पैकी अनुक्रमे १३ व १८ आर क्षेत्रावर प्रतिवादींनी अतिक्रमण केल्याचे कथन केले आहे. अशा परिस्थितीत वादीस त्याची केस म्हणजेच प्रतिवादींनी दावा मिळकतीत अतिक्रमण केले आहे किंवा नाही तसेच केले असल्यास किती क्षेत्रावर अतिक्रमण केले ही बाब शाबीतीकरीता दावा मिळकतीची मोजणी करणे गरजेचे आहे. अन्यथा वादीस त्याची केस शाबीत करता येणार नाही. करीता वादग्रस्त मिळकतीचे गट नं.५४ व ६८ यांची न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करुन मोजणी होणे व त्याचा अहवाल अभिलेखावर येणे गरजेचे आहे. परिणामी, वादीचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. करीता, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. तालुका उपनिरीक्षक भूमि अभिलेख, शिरुरकासार यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी मौजे रायमोहा, ता. शिरुरकासार, जि. बीड येथील गट नं.५४ व ६८ या मिळकतीच्या संपुर्ण क्षेत्राची मोजणी करुन सदर मिळकतीतील हिस्सेदारांचे वहिवाट व अभिलेखाचे अनुषंगे मोजणी अहवाल नकाशा सह सादर करावा.

४. वादीने न्यायालयीन आयुक्तांची फी त्यांच्या संबधीत कार्यालयात जमा करावी. तसेच मोजणी कामा करीता लागणाऱ्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करावी.

५. न्यायालयीन आयुक्त यांनी मोजणी पुर्व नोटीसा वादी व प्रतिवादी यांना देवुन मोजणीचे काम करावे.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP

Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2024.09.13 17:48:10 +0530

शिरुरकासार
दि. १३/०९/२०२४

**(अ. सं. जगताप)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरुरकासार

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
[P.B. Kusumkar]
Stenographer Grade-3

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 13/09/2024 |
| Transcribed on | : | 13/09/2024 |
| Checked & signed on | : | 13/09/2024 |